UGC CARE LISTED
ISSN No.2394-5990

# संशोधक

• वर्ष : ९२ • मार्च २०२४ • पुरवणी विशेषांक ०८




प्रकाशक : इतिहासाचार्य वि.का.राजवाडे संशोधन मंडळ,धुळे

UGC CARE LISTED
ISSN No. 2394-5990

# इतिहासाचार्य वि. का. राजवाडे मंडळ, धुळे
## या संस्थेचे त्रैमासिक

# ।। संशोधक ।।

**पुरवणी अंक ८ – मार्च २०२४ (त्रैमासिक)**

- शके १९४५
- वर्ष : ९२
- पुरवणी अंक : ८

**संपादक मंडळ**

- प्राचार्य डॉ. सर्जेराव भामरे
- प्राचार्य डॉ. अनिल माणिक बैसाणे
- प्रा. डॉ. मृदुला वर्मा
- प्रा. श्रीपाद नांदेडकर

**अतिथी संपादक**

- प्राचार्य डॉ. के. एच. शिंदे
- डॉ. एस. व्ही. पणदे
- डॉ. बी. एम. मगदूम

*** प्रकाशक ***

**श्री. संजय मुंदडा**

कार्याध्यक्ष, इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे ४२४००१
दूरध्वनी (०२५६२) २३३८४८, ९४२२२८९४७१, ९४०४५७७०२०

Email ID : rajwademandaldhule1@gmail.com
rajwademandaldhule2@gmail.com

**कार्यालयीन वेळ**

सकाळी ९.३० ते १.००, सायंकाळी ४.३० ते ८.०० (रविवारी सुट्टी)

अंक मूल्य रु. १००/-

वार्षिक वर्गणी (फक्त अंक) रु. ५००/-, लेख सदस्यता वर्गणी : रु. २५००/-

**विशेष सूचना :** संशोधक त्रैमासिकाची वर्गणी चेक/ड्राफ्टने 'संशोधक त्रैमासिक राजवाडे मंडळ, धुळे' या नावाने पाठवावी.

**अक्षरजुळणी :** सौ. सीमा शिंत्रे, पुणे.

टीप : या नियतकालिकेतील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

ISSN No 2394-5990


६१. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्त्रीमुक्तीतील योगदान

- डॉ. काशिनाथ जगन्नाथ सोलनकर ---------- २६४

६२. महिला सक्षमीकरणा मध्ये 'मदर इंडिया' चित्रपटाचे योगदान

- १) गडगे शांता रंगनाथ २) डॉ. के.एम. अंबाडे ---------- २६७

६३. सांख्यिकी शास्त्रज्ञ सी. आर. राव यांच्या संशोधनाचे मूल्य

- विजय कोष्टी ---------- २७०

६४. स्त्रीवादी चळवळ

- कु. योगिता रामचंद्र रेवडे ---------- २७४

६५. स्वातंत्र्य चळवळीत आदिवासी क्रांतिकारक बिरसा मुंडा यांचे योगदान

- प्रा. रामदास रमेश वसावे ---------- २७७

६६. डॉ. बाबासाहेब आंबेडकर : महिला सक्षमीकरण विचार व सद्यस्थिती

- १) मोनाली सिध्दार्थ लोंढे, २) प्रा. डॉ. संजय गायकवाड ---------- २८१

६७. दलित चळवळीच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीचा सामाजिक दृष्टिकोनातून चिकित्सात्मक अभ्यास

- १) रोशनी बाबुराव कांबळे, २) प्राचार्य डॉ.अशोक केशवराव सपाटे ---------- २८५

६८. भारतीय इतिहासलेखन आणि सबाल्टर्न इतिहासलेखन परंपरा

- १) डॉ. मल्लिकार्जुन बंदारे, २) डॉ. हाजी नदाफ ---------- २९०

६९. स्वातंत्र्यसैनिक डॉ. सत्यवती लिमये

- प्रा. कल्याण जयसिंगराव चव्हाण ---------- २९४

७०. स्त्री – जीवनाचे विविध पैलू

- १) डॉ. उज्वला पाटील, २) प्रा. डॉ. विश्वनाथ पवार, ३) डॉ. राजेंद्र सोनावले ---------- २९८

७१. इतिहासातील नवविचारप्रवाह दृष्टीकोन या संदर्भात वंचितवादी इतिहास लेखन प्रवाहाचे चिकित्सक परिक्षण

- प्रा.डॉ. संतोष तुकाराम कदम ---------- ३०२

७२. ग्रामीण भागातील दुग्ध व्यवसायाची भूमिका

- १) एस. आर. कुंडले २) डॉ. पी. बी. पाटील ३) डॉ. ए.एस. कांबळे ---------- ३०६

# स्त्री - जीवनाचे विविध पैलू

**१) डॉ. उज्वला पाटील**
प्र. प्राचार्या,
डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय,
रामानंदनगर(बुर्ली), ता. पलूस
hiujwalapatil@gmail.com
९०९६८०५५०९

**२) प्रा. डॉ. विश्वनाथ पवार**
इतिहास विभाग,
डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय,रामानंदनगर (बुर्ली)
vppawar13968@gmail.com
७७९८१२२०२६

**३) डॉ. राजेंद्र सोनावले**
इतिहास विभागप्रमुख
डॉ. पतंगराव कदम महा. रामानंदनगर (बुर्ली)
rajendrasonawale26@gmail.com
८३२९ ६८८७४३

**प्रस्तावना :**

'स्त्री जीवनाचे विविध पैलूफया शोध- निबंधाच्या माध्यमातून भारतीय स्त्रियांच्या जीवन वाटचालीतील विविध पैलूचा मागोवा घेण्यात येत आहे. स्त्रियांचे असने सहज नव्हते ते समाज व्यवस्थेने जाणीवपूर्वक केले होते. मात्र यामधून स्त्री संघटनांनी व समाज सुधारकांनी स्त्री मुक्तीचा मार्ग सुकर केला.

**वेदकालीन स्त्री :**

भारतीय समाजात स्त्रीचे स्थान पूर्वी कसे होते याची माहिती वैदिक काळापासून मिळू शकते. हा काळ चार हजार वर्षांचा असावा. इ. स. पूर्व ६००० वर्षांपर्यंतच्या कालखंडात काही महत्त्वाचे ग्रंथ लिहिले गेले. वेद, ब्राह्मणे, उपनिषदे या ग्रंथांवरून स्त्रियांची स्थिती कशी होती हे समजून येते. या काळात स्त्रियांना समानता होती. पुरुषांप्रमाणे त्यांचाही उपनयन संस्कार आवश्यक मानला जाई.[१] त्यांनाही विविध कला व विद्या शिकता येत होत्या. विवाह हा एक संस्कार मानला जाई. बालविवाहाची प्रथा त्या वेळी नव्हती. सामान्यपणे वय वर्षे सोळा हे विवाहयोग्य वय मानले जाई. सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे स्त्रीला स्वत:चा जोडीदार निवडण्याचे स्वातंत्र्य असे. बहुपत्नीत्वाची प्रथा जरी योद्धे, धनिक, ग्रामप्रमुख व विद्वानांत आढळून येत असली तरी एकविवाह पद्धतीच आदर्श मानली जाई. विधवेला पुनर्विवाहाचे स्वातंत्र्य होते.[२] विवाहापूर्वी व विवाहानंतर पतीच्या संमतीने स्त्रियांना कला शिकण्याचे स्वातंत्र्य होते. काही स्त्रिया ज्ञानसाधनेसाठी अविवाहित राहिल्याचे दिसते.

सारांश, वेदकालीन स्त्रीला पुरुषाइतकेच समान स्थान होते. जीवनाच्या विविध क्षेत्रांत तिचा मुक्त संचार होता. तिचा उल्लेख आदराने व गौरवाने केला जाई. तिच्या विद्वत्तेचा मान केला जाई. ज्ञानदानाच्या क्षेत्रात काम करणाऱ्या स्त्रियांची संख्याही पुष्कळ असे. त्या काळात स्त्री व पुरुष हे श्रेष्ठ–कनिष्ठ न मानता ते समान व एकमेकांना पूरक मानीत. म्हणूनच एकमेकांशिवाय त्यांचे आयुष्य अपूर्ण मानले जाई. डॉ. आळतेकरांच्या मते स्त्रियांच्या या उच्च दर्जाला तत्कालीन परिस्थिती जबाबदार होती. कारण पुरुष सतत युद्धात व्यग्र असत. त्यामुळे आर्थिक बाबींची व घराची जबाबदारी स्त्रियांनाच उचलावी लागे.

**भारतीय स्त्री चे बदलते स्थान (रामायण व महाभारत काळ) :**

या काळात स्त्रियांची काही बाबतीत अवनती झाल्याचे दिसून येते. सती पद्धती नव्हती, प्रेमविवाह होत होते, जाणतेपणात विवाह होत होते. हे जरी खरे असले तरी इ. स. ३०० नंतर भारतात झालेल्या सामाजिक बदलांमुळे स्त्रीकडे बघण्याचा दृष्टिकोण बदलला. स्त्री चारित्र्याबाबत अधिक संवेदनशीलता निर्माण झाली. उच्च वर्गातील स्त्रियांनाच केवळ संगीत, नृत्य व गृहव्यवसाय यांचेच शिक्षण घेण्याची परवानगी होती. दिवसेंदिवस स्त्रियांवरील बंधने वाढू लागली. याचे कारण म्हणजे आर्य व अनार्य यांच्यामध्ये वैवाहिक संबंध प्रस्थापित होऊ नयेत हे आहे. स्त्रियांच्या चारित्र्यविषयक कल्पनेने त्यांच्यावर समाजाची करडी नजर राहू लागली. शेती व्यवसायाने समाजाला व कुटुंबाला स्थैर्य दिले; पण शेती व्यवसायास आवश्यक असणारे मनुष्यबळ आपल्या हक्काचे असावे यासाठी एकत्र कुटुंबपद्धती बळकट झाली. त्यामुळे वाढत्या आकाराबरोबरच

ISSN No 2394-5990

कौटुंबिक जबाबदाऱ्या वाढल्या व स्त्रियांचे कार्यक्षेत्र घराला बांधून राहिले. त्यातच या काळात धार्मिक कर्मकांडांचे स्तोम वाढले व ते पार पाडण्याचे हक्क फक्त मुलांचे मानण्यात येऊ लागले. त्यामुळे बदलती सामाजिक परिस्थिती, नीतिमत्तेच्या बदलत्या कल्पना व एकत्र कुटुंबपद्धती यामुळे स्त्रियांची अवनती होऊ लागली.

**स्त्री बंधने वाढतच गेली :**

पुढे हिंदुस्थानात शक आले, कुशाण आले, हूण आले. त्यांनी केलेल्या आक्रमणांमुळे स्त्री घराबाहेर निघू शकत नव्हती. हिंदुस्थानात इस्लामचा प्रवेश झाल्यानंतर स्त्रियांचे घराबाहेर पडणेच बंद झाले. ती पूर्णपणे बंदिस्त झाली; तिला शिक्षण मिळणेदेखील अशक्य झाले. त्यात पुन्हा देवदासी पद्धती, बालविवाह पद्धती, जरठकुमारी विवाहपद्धती अशा रूढींमुळे स्त्रियांची स्थिती अधिक केविलवाणी झाली. ह्यू-एन्-त्संग या चिनी प्रवाशाच्या प्रवासवृत्तांतात व मराजतरंगिणीफया लेखात देवदासी पद्धतीचा उल्लेख आढळतो, यात मुली देवाला अर्पण केल्या जात. त्यांचा विवाह देवाशीच लागत असे. त्यानंतरचे तिचे जीवन म्हणजे साक्षात नरक होता. बालविधवेची स्थिती अशीच दुर्दैवी होती. पतीच्या निधनानंतर सती जाणे हे प्रतिष्ठेचे मानले जाई; पण सती न गेल्यास केशवपन करून सर्व सौभाग्यचिन्हे तिला उतरावावी लागत, अंधारकोठडीत एक पापी म्हणून तिला जीवन कंठावे लागे. अशुभ, अपवित्र अशा बिरुदावल्या चिकटविल्याने तिला देवपूजेला मज्जाव होता. जरठकुमारी विवाहप्रथेने तर स्त्रियांची कोंडी झालेली होती. जख्खड म्हाताऱ्याचे लग्न तरुण मुलीशी लावले जात असे. या प्रथेमुळे घरोघरी विधवा होत्या, जो विवाह आई-वडील ठरवतील व ज्याच्याशी ठरवतील तोच मान्य करून त्याच्याशी तिला उभा जन्म काढावा लागे. नऊ वर्ष वयाच्या पंडिता रमाबाईंचे लग्न पंचेचाळीस वर्ष वयाच्या पुरुषाशी झाले होते.[२]

**स्त्रियांच्या बंधमुक्तीची मुहूर्तमेढ पुरुषांकडून :**

स्वातंत्र्यपूर्व काळात स्त्री-स्वातंत्र्याची मुहूर्तमेढ पुरुषांनी रोवली. राजा राममोहन रॉय यांनी केलेल्या प्रयत्नांमुळे इ. स. १८२९ मध्ये लॉर्ड विल्यम बेंटिंकने सतीबंदीचा कायदा पास केला तेव्हापासून स्त्री-मुक्तीला सुरुवात झाली. पुढे इ. स. १८५६ मध्ये विधवा पुनर्विवाह कायदा पास झाला. त्यानंतर स्त्रियांच्या दृष्टीने महत्त्वाचा संमती वयाचा कायदा ऊर्फ शारदा कायदा इ. स. १९२९ साली पास झाला. स्वातंत्र्य चळवळीच्या काळात स्त्री-मुक्ती चळवळ पूर्ण लोकशाही मार्गांनी चालू होती.

स्त्रियांना समान दर्जा व अन्याय निवारण ही त्यांच्या चळवळीची दोन प्रमुख उद्दिष्टे होती. इ. स. १९२६ पासून राज्यांच्या विधिमंडळाचे सदस्यत्वही त्यांना मिळू लागले. मुथुलक्ष्मी रेड्डी या मद्रास प्रांतात पहिल्या विधिमंडळाच्या उपाध्यक्षपदी निवडून आल्या; तर मुंबई प्रांतात श्रीमती सरोजिनी नायडू निवडून आल्या. इ.स. १९३० मध्ये भरलेल्या पहिल्या गोलमेज परिषदेकडे देण्यासाठी ऑल इंडिया वूमेन्स कॉन्फरन्सने एक निवेदन तयार केले. त्यात,

१) सर्व भारतीयांना समान हक्क द्यावेत.
२) धर्म, जात व लिंग अशा कोणत्याही कारणासाठी भारतीयांमध्ये भेदाभेद केला जाऊ नये.
३) सर्व प्रौढांना विनाअट मतदानाचा हक्क मिळावा.
४) स्त्रियांना पुरुषांप्रमाणेच सर्वसाधारण मतदारसंघातून निवडणुका लढविता याव्यात अशा मागण्या केल्या होत्या.

त्यांच्या या मागण्यांपैकी इ. स. १९३२ साली एकवीस वर्षांवरील सर्व स्त्रियांना मतदानाचा अधिकार मिळाला.

सुचेता कृपलानी, अरुणा असफअली यांसारख्या स्त्रियांनी १९४२ च्या चले जाव चळवळीत भूमिगत राहून भाग घेतला, कमलादेवी चट्टोपाध्याय या अखिल भारतीय महिला परिषदेच्या (AIWC) अध्यक्षा झाल्या. त्यांना याच वेळी अटक झाली. इ. स. १९४४ मध्ये त्यांची सुटका झाली. याच वर्षी अखिल भारतीय कॉंग्रेसची महिला शाखा स्थापन झाली. या चळवळीत विद्यार्थिनींनीसुद्धा भाग घेतला होता. शकुंतला शर्मा नावाच्या अलाहाबादच्या विद्यार्थिनीने कलेक्टर कचेरीवर तिरंगा फडकविण्याचे धाडस केले होते. तसेच कॅबिनेट मिशन जेव्हा भारतभेटीवर आले तेव्हा याच स्त्रियांनी प्रचंड संख्येने एकत्र येऊन स्वतःच्या मागण्या बाजूला ठेवून भारताच्या स्वातंत्र्याचीच मागणी केली. स्त्रियांच्या स्वातंत्र्यलढ्यातील अशा सहभागामुळेच घटनासमिती स्थापन झाली. तेव्हा देशभर पसरलेल्या महिला संस्थांच्या प्रतिनिधींना घटनानिर्मितीच्या कामात भाग घेण्यासाठी पाचारण करण्यात आले होते. इ. स. १९४६ मध्ये घटनासमिती स्थापन झाली तेव्हा चौदा स्त्रिया तिच्या सभासद होत्या. घटनेच्या ३२६ व्या कलमानुसार कोणताही भेदाभेद न करता सर्व भारतीय नागरिकांना मतदानाचा अधिकार मिळाला. लिंगावर आधारित भेदभाव त्यामुळे नाहीसा झाला.

**स्त्री-मुक्तीची पहाट :**

स्त्री-मुक्तीची खरी पहाट इ. स. १९५५-५६ मध्ये हिंदू कोड बिल पास झाले तेव्हा झाली. स्वातंत्र्यलढ्यात पुढाकार घेऊन पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून लढणाऱ्या महिलांच्या

स्वराज्याकडून असलेल्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी हे बिल मांडण्यात आले. स्त्रियांवरील अन्याय दूर करून त्यांना समान दर्जा मिळाला पाहिजे याबद्दल लोकमत तयार झालेले होते. या कायद्यामध्ये द्विभार्या प्रतिबंधक कायदा, वारसा कायदा, घटस्फोटाचा कायदा, मूल दत्तक घेण्याचा व घटस्फोट झाल्यास पतीकडून पोटगी मिळण्याचा हक्क देणारा कायदा, आईला मुलाची नैसर्गिक पालक म्हणून मान्यता देणारा कायदा, वेश्याव्यवसायासाठी मुलींच्या खरेदी-विक्रीवर बंदी घालणारा कायदा असे अनेक कायदे होते. त्यातील वारसा कायद्याला लोकसभेत डॉ. राजेंद्रप्रसाद व इतर सर्वच सभासदांचा जोरदार विरोध होता. कारण या कायद्यामुळे हिंदू कुटुंबसंस्था मोडून पडेल अशी सर्वांना भीती वाटली. पित्याच्या संपत्तीत मुलांप्रमाणेच मुलींना वारसा हक्काने समान वाटा मिळाला तर कुटुंब व आप्तसंबंध नष्ट होतील असे सर्वांचे म्हणणे होते. हे कलम सोडून बाकीचे बिल पास करण्याची लोकसभेची तयारी होती; पण हे बिल मांडणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर बिलातून हे कलम वगळण्यास तयार नव्हते. शेवटी बिल मागे घेतले गेले. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर राजीनामा देऊन बाहेर पडले. पुढे हे बिल तुकड्या-तुकड्यांनी पास झाले. वारसा कायद्यात मुलींचा समान वाटा पित्याच्या इच्छेवर सोडण्यात आला.[५]

**स्त्रियांच्या बंधमुक्तित अधिक भर :**

सुरुवातीस घटस्फोट सोपा नव्हता. वेळखाऊ होता. इ. स. १९७६ च्या दुरुस्ती कायद्याने सर्व विवाह नोंदणे अनिवार्य ठरले. त्यामुळे परस्परसंमतीने घटस्फोट मिळू लागला. समान वेतन कायदा केल्यामुळे स्त्रियांच्या सामाजिक दर्जात सुधारणा घडून आली. इ. स. १९६१ मध्ये हुंडाबंदी कायदा पास करण्यात आला. त्यात इ. स. १९८४ मध्ये सुधारणा करण्यात आली. त्यानुसार हुंड्यासाठी होणारा स्त्रीचा छळ हा दखलपात्र गुन्हा ठरविण्यात आला. त्यात इ. स. १९८६ मध्ये जी दुसरी दुरुस्ती करण्यात आली त्यानुसार विवाहानंतर सात वर्षांच्या आत स्त्रीने आत्महत्या केली आणि तिचा छळ केला गेला हे सिद्ध झाले तर नवरा व सासू-सासऱ्यांना शिक्षा होऊ शकते. इ. स. १९७१ मध्ये वैद्यकीय कारणासाठी गर्भपात कायदेशीर ठरला, सरकारी हॉस्पिटलमधून तो मोफत केला जातो. यामुळे नको असलेल्या संततीतून स्त्रीला सुटका करून घेता येऊ लागली. इ.स. १९८० च्या कायद्यानुसार बलात्कारासारख्या केसेसमध्ये स्त्रीला बदनामीपासून वाचविण्यासाठी केस न्यायाधीशांच्या चेंबरमध्ये करण्याची तरतूद केली. इ. स. १९८४ मध्ये कौटुंबिक दावे चालविण्यासाठी स्वतंत्र कौटुंबिक न्यायालय स्थापन करण्यात आले.[६]

**स्त्री-पुरुष समतेचे महत्त्व :**

लोकशाही शासनव्यवस्थेत स्त्रियांच्या सहभागाला भारतात योग्य वातावरण असले तरी निर्णय प्रक्रियेत त्यांचा समावेश फार कमी आहे. स्त्रियांनी राजकारणात मोठ्या प्रमाणावर भाग घेतला तर राजकारणाचा रंग बदलेल व त्याचे गुन्हेगारीकरण कमी होईल, स्पर्धात्मक राजकारणापेक्षा विधायक कार्यक्रमांवर लक्ष केंद्रित होईल हे सर्वांना मान्य आहे. त्यामुळे त्यांच्या राजकारणातील प्रवेशात येणारे अडथळे शोधून दूर केले पाहिजेत. हळूहळू कौटुंबिक, सामाजिक व सांस्कृतिक अडथळे दूर होत आहेत. स्त्रिया राजकीय सहभाग व सत्तेचा वापर करून दारूबंदीसारख्या प्रश्नांवर आवाज उठवित आहेत. परंतु त्यात हवा तसा जोर नाही. विधिमंडळातून स्त्रियांची संख्या वाढल्यानेच त्या परिणामकारक ठरतील असे नव्हे; पण सत्तापदे मिळवून त्यांचा योग्य वापर करून जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी त्यांना योग्य त्या सोई व अधिकार देणे गरजेचे आहे. ग्रामीण भागात तयार झालेले महिला नेतृत्व राष्ट्रीय पातळीवर पोहोचेलच असे नाही, पण ७३ व ७४ व्या घटनादुरुस्तीने स्त्रियांच्या हाती सत्ता सोपविण्यासाठी पहिले पाऊल उचलले आहे.[७]

घटनेने आश्वासन दिल्याप्रमाणे स्त्री-पुरुष समानता प्रस्थापित करण्यासाठी वेगवेगळे कायदे केले आहेत. त्यात कामगार कायदे, फौजदारी कायदे, कौटुंबिक कायदे व नागरी कायदे असे प्रकार आहेत. त्यांपैकी काही कायदे स्त्रीविषयक नसले तरी स्त्रियांना उपकारक ठरतात. उदाहरणार्थ, दारूबंदी. राष्ट्रीय महिला आयोग वेळोवेळी या कायद्यात सुधारणा सुचवितो. असे असले तरी स्त्रियांचा फार मोठा समाज घटनेने दिलेल्या अधिकारांपासून व कायद्याने दिलेल्या संरक्षणापासून वंचित राहतो. याचे कारण दारिद्र्य व अज्ञान हे होय. असे असूनही सरकारने विविध भाषांमध्ये माहिती देणाऱ्या सचित्र पुस्तिका काढल्या असून प्रमुख केंद्रातून विनामूल्य कायद्याची मदत उपलब्ध करून दिलेली आहे.[८]

**स्त्रीविषयक गृहीतके :**

पुरुषी वर्चस्व असलेला समाज स्त्री व पुरुष समान आहेत हा विचार मान्य करीत नाही. ती पुरुषाहून अनेक बाबतीत गौण आहे, जीवनाच्या विविध क्षेत्रांत पुरुषाचा जसा मुक्त संचार असू शकतो तसा संचार असण्याची क्षमता स्त्रीमध्ये नाही, असा सोईचा अर्थ लावून तो रुजविला जातो. म्हणून स्त्री-पुरुषाचे संबंध बरोबरीचे नसून ते श्रेष्ठ-कनिष्ठतेचे मानण्यात येतात. पुरुषांनी नेतृत्व करावे, प्रसिद्धी व कीर्ती मिळवावी. पडद्यामागची कामे स्त्रियांनी करावीत हे अलिखितपणे ठरून

ISSN No 2394-5990

गेले होते. स्त्री-पुरुष नाते समानतेचे असले पाहिजे हा स्त्री-मुक्ती चळवळीचा गाभा आहे. स्त्रियांची बौद्धिक व मानसिक क्षमता पुरुषांच्या बरोबरीने आहे, ही सिद्ध झालेली वस्तुस्थिती आहे. असे कोणतेच क्षेत्र नाही की, जेथे स्त्रिया अपुऱ्या पडतात; पण पुरुषप्रधानतेमध्ये स्त्रीच्या योग्यतेचे किंवा पात्रतेचे योग्य माप स्त्रीच्या पदरात घातले गेले नाही. कारण स्त्री ही पुरुषापेक्षा वेगळी व गौण आहे हे गृहीतच धरले जाते. या गृहीताचाच संस्कार मुला-मुलींच्या सामाजिकीकरणाच्या प्रक्रियेत घरोघरी केला जातो.[९]

**स्त्री-मुक्तीसमोरील आव्हाने :**

(१) गरिबी, (२) अज्ञान, (३) परंपरागत पुरुषसत्ताक कुटुंबसंस्था आणि त्यातून निर्माण होणारा स्त्रियांचा कनिष्ठ दर्जा, (४) पर्यावरणाचा ढासळता तोल व त्याचे स्त्रियांना भोगावे लागणारे परिणाम, (५) आरोग्य सेवेतील अपुरेपणा, (६) स्त्रियांचा राजकारणातील अल्प सहभाग, (७) सामाजिक मूल्यव्यवस्था व परंपरागत दृष्टिकोन, (८) कायद्याची ढिलाई, (९) अपुऱ्या रोजगार संधी यांसारखी अशी अनेक आव्हाने स्त्री-मुक्तीवादी आणि सरकार यांच्यापुढे आहेत. त्यामुळे असा प्रश्न निर्माण होतो की, आपली मूल्यमापन पद्धती बरोबर आहे का ? एखाद्या राष्ट्राच्या विकासाचे आज गमक काय मानायचे? स्त्रियांना सत्तेत सहभागी करून त्यांना सामर्थ्यवान बनविण्याची योजना राबवून २१ व्या शतकात स्त्रियांना सुखी करण्यात सरकारने आपली फार मोठी भूमिका पार पाडायची आहे. तसेच बिनसरकारी संघटना, चळवळी व व्यक्ती यांच्या प्रयत्नात समन्वय साधायचा आहे. या सर्व प्रक्रियेत स्त्रियांचे भविष्य उज्ज्वल होईल अशी आशा आहे.[१०]

**स्त्रीवाद :**

Feminism (फेमिनिझम) हा मूळ शब्द लॅटिन भाषेतील आहे. Femina या शब्दाचा अर्थ Woman असा आहे. १८९० च्या दशकात Womanismच्या ऐवजी Feminism हा शब्द पहिल्यांदा वापरला गेला. Womanism हा शब्द Theory of sexual equality and the movement For women's right' म्हणजेच लैंगिक समानतेचा सिद्धांत आणि स्त्रियांच्या हक्काची चळवळ' या अर्थाने वापरला जाऊ लागला.[११]

ताराबाई शिंदे यांनी 'स्त्री-पुरुष तुलना' हा महत्त्वपूर्ण ग्रंथ लिहला. सावित्रीबाई फुले यांनी मुलींसाठी पहिली शाळा सुरु केली. पंडिता रमाबाई यांनी विधवाश्रम व शारदा सदन सुरु केले. तर रमाबाई रानडे यांनी हिंदू लेडिज सोशल क्लब स्थापन केला. पंडिता रमाबाई यांनी स आर्य महिला समाजाचीही स्थापना केली.[१२]

**सारांश :**

स्त्री जीवनाचे विविध पैलू वेदकालीन स्त्री, स्त्री बंधने वाढतच गेली, स्त्रियांच्या बंधमुक्तीची मुहूर्तमेढ, स्त्री मुक्तीची पहाट, स्त्रियांच्या बंधमुक्तीत अधिक भर, स्त्री-पुरुष समतेचे महत्त्व, स्त्रीवाद यावर प्रकाश टाकता आला.

**संदर्भ सूची :**


१) प्राचार्य कदम य. ना., आधुनिक भारत, फडके प्रकाशन कोल्हापूर, एप्रिल, २००५, पृ.१५१

२) कित्ता, पृ. १६०

३) तांबोळी एस.एन., पवार व्ही.पी., निराली प्रकाशन, पुणे, फेब्रुवारी २०१०, पृ.१८-२

४) सरदेसाई, नलावडे, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००४, पृ.३४१

५) तांबोळी एस.एन., पवार व्ही.पी., निराली प्रकाशन, पुणे, फेब्रुवारी २०१०, पृ.१८-३

६) कित्ता, पृ.१८-३

७) कित्ता, पृ.१८-४

८) कित्ता, पृ.१८-४

९) कित्ता, पृ.१८-६

१०) कित्ता, पृ.१८-५

११) पाटील पद्मजा, जाधव शोभना, 'भारतीय इतिहासातील स्त्रिया' फडके प्रकाशन, कोल्हापूर, मार्च २००७, पृ.१७

१२) राऊत गणेश, राऊत ज्योती, 'महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास' डायमंड पब्लिकेशन्स, पुणे ३०, सप्टेंबर २००५, पृ.१९९


■■■